

# मुंबई विद्यापीठ

# University of Mumbai

दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी
सकाळी ११.०० वाजता झालेल्या
अधिसभेच्या विशेष सभेचे इतिवृत्त

**MINUTES OF THE
SPECIAL MEETING OF THE
SENATE HELD ON
21st JULY, 2018
AT 11.0 a.m.**

# मुंबई विद्यापीठ

मसुदा | अधिसभा

क्र.१/२०१८-१९ | २१ जुलै, २०१८

अधिसभेची सभा विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर सभागृह (दिक्षांत सभागृह) येथे शनिवार दिनांक २१ जुलै २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. सभेमध्ये मा. कुलगुरू, मा. प्र—कुलगुरू यासह अधिसभा सदस्य असे खालिल एकूण ६० सदस्य उपस्थित होते :—

| अनु क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १ | प्रा. सुहास रघुनाथ पेडणेकर, कुलगुरु अध्यक्ष |
| २ | प्रा. रविंद्र दत्तात्रय कुलकणी, प्र—कुलगुरु |
| ३ | प्राचार्य (डॉ) मुरलीधर कुऱ्हाडे, प्रभारी अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा |
| ४ | डॉ. सुरेश उकरंडे, प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा |
| ५ | प्राचार्य (डॉ) अजय भामरे, प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन |
| ६ | डॉ. रश्मी ओझा, प्रभारी अधिष्ठाता, आंतर—विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा |
| ७ | डॉ. अर्जुन घाटुळे, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ८ | श्री. संजय शहा, वित्त व लेखा अधिकारी |
| ९ | डॉ. रोहीदास काळे, सह—संचालक, उच्च शिक्षण संचालनालय |
| १० | डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय |
| ११ | श्री. भुजंग की. अहिरे, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र |
| १२ | डॉ.सुनिल पाटील, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ |
| १३ | डॉ. दिलीप एस. पाटील, संचालक, डिपार्टमेंट ऑफ लाईफ लॉग लर्निंग |
| १४ | प्राचार्य (डॉ) शाम रघुनाथ जोशी |

| | |
|---|---|
| १५ | प्राचार्य (डॉ) तुषार मनोहर देसाई |
| १६ | प्राचार्य (डॉ) नागेंद्रनाथ बेचन पांडे |
| १७ | प्राचार्य (डॉ) अनुजा नारायण पळसुलेदेसाई |
| १८ | प्राचार्य (डॉ) विठ्ठल बळीराम रोकडे |
| १९ | प्राचार्य (डॉ) महादाप्पा गंगाराम गोंडा |
| २० | प्राचार्य (डॉ) धनाजी शंकर गुरव |
| २१ | श्री. संजय बाबूराव शेटे |
| २२ | ॲड. निल गिरीश हेळेकर |
| २३ | श्री. हसमुख देवजी रांभिया |
| २४ | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन |
| २५ | डॉ. सुभाष कृष्णा वाघमारे |
| २६ | प्रा. वैभव एकनाथ नरवडे |
| २७ | डॉ. अनंत नाना लोखंडे |
| २८ | डॉ. चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी |
| २९ | डॉ. निशा मनोज मुनी |
| ३० | प्रा. मोहम्मद ताहिर |
| ३१ | प्रा. गुलाबराव बापू राजे |
| ३२ | डॉ. रविकांत बालकृष्ण सांगुर्डे |
| ३३ | प्रा. रविंद्रनाथ सोन्याबापू रसाळ |
| ३४ | प्रा. प्रकाश दामोदर दातार |
| ३५ | डॉ. श्रीमती आरती प्रसाद |
| ३६ | प्रा. सुरेश नामदेव मैंद |
| ३७ | डॉ. संगिता निवृत्ती पवार |
| ३८ | प्रा. मृदूल जगन्नाथ निळे |
| ३९ | श्री. महादेव बाबुराव जगताप |
| ४० | श्री. प्रदिप बाळकृष्ण सावंत |
| ४१ | श्री. प्रविण महादेव पाटकर |
| ४२ | डॉ. सुप्रिया गजानन करंडे |
| ४३ | श्री. मिलींद हरीशंद्र साटम |
| ४४ | श्रीमती शितल स्वप्निल शेठ–देवरुखकर |
| ४५ | श्री. निखिल यशवंत जाधव |
| ४६ | श्री. धनराज नीळकंठ कोहचाडे |
| ४७ | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे |
| ४८ | श्री. राजन वसंत कोळंबेकर |
| ४९ | श्री. मंदार सावंत देसाई |
| ५० | श्री. धनेश सावंत |
| ५१ | प्रा. डी.पी. मेहता |
| ५२ | ॲड. वैभव थोरात |
| ५३ | फादर मॅगी मुर्झेलो |
| ५४ | श्री. दिपेश मेहता |
| ५५ | श्री. राजिव काशिकर |

| | |
|---|---|
| ५६ | श्री. सुधाकर शंकर तांबोळी |
| ५७ | श्री. रुपेश मालुसरे |
| ५८ | श्री.दिलीप पवार |
| ५९ | ॲड. अनिल परब |
| ६० | डॉ. दिनेश कांबळे, सदस्य सचिव |

सभेची सुरूवात वंदेमात्‌रम या गीताने झाली.

**श्रध्दांजली :—**

**श्रीमती उर्मिला सिरुर**

ज्येष्ठ लेखिका श्रीमती उर्मिला सिरुर यांचे दिर्घ आजाराने दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ८७ वर्षाच्या होत्या.

**पंडित अच्युत केशव अभ्यंकर**

ज्येष्ठ गायक पंडित अच्युत केशव अभ्यंकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षाचे होते.

**पंडित ब्रजभुषन काबरा**

ज्येष्ठ गिटारवादक पंडित ब्रजभुषन काबरा यांचे वृध्दापकाळाने दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षाचे होते.

**डॉ. रामचंद्र गाडगिळ**

जुन्या पिढीतील प्रसिध्द पॅथॉलॉजिस्ट डॉ. रामचंद्र कृष्णा गाडगिळ यांचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९७ वर्षाचे होते.

**श्री. अरुण दाते**

ज्येष्ठ भावगित गायक श्री. अरुण दाते यांचे दिर्घ आजाराने दिनांक ६ मे, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८४ वर्षाचे होते.

**श्री. हिमांशू रॉय**

वरिष्ठ पोलिस अधिकारी श्री. हिमांशू रॉय यांचे दिनांक ११ मे, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ५४ वर्षाचे होते.

## श्रीमती यमुनाबाई वाईकर

पारंपारिक पध्दतीने बैठकीची घरंदाज लवणी गाणा-या लावणी सम्राज्ञी पद्मश्री श्रीमती यमुनाबाई वाईकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १५ मे, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या १०३ वर्षाच्या होत्या.

## श्री. जीवा म्हसे

वारली चित्रशैली जगभरात अजरामर करणारे पालघर जिल्हयातील पद्मश्री श्री. जीवा म्हसे यांचे वृध्दापकाळाने दिनांक १५ मे, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८७ वर्षाचे होते.

## डॉ. हेमू अधिकारी

वैज्ञानिक, कलावंत आणि कार्यकर्ते अशा 'बहुरुपी' व्यक्तीमत्वाने वावरणारे, जुलूस या नाटकामुळे प्रकाश झोतात आलेले आणि प्रायोगिक रंगभूमी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते डॉ. हेमू अधिकारी यांचे वृध्दापकाळाने दिनांक २१ मे, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षाचे होते.

## श्रीमती गीता कपूर

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती गीता कपूर यांचे वृध्दापकाळाने दिनांक २७ मे, २०१८ रोजी निधन झाले.

## श्री. पांडुरंग फुडंकर

कृषीमंत्री श्री. पांडुरंग फुडंकर यांचे ह्रदयविकाराने दिनांक १ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६७ वर्षाचे होते.

## श्री. दादाजी खोब्रागडे

तांदळाच्या नऊ जातीचे जनक श्री. दादाजी खोब्रागडे यांचे दिनांक ४ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७९ वर्षाचे होते.

## डॉ. कमलाकर देसाई

डॉ. कमलाकर देसाई यांचे वृध्दापकाळाने दिनांक ४ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८२ वर्षाचे होते.

## माजी खासदार श्री. शांताराम नाईक

माजी खासदार श्री. शांताराम नाईक यांचे ह्रदयविकाराने दिनांक १० जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७२ वर्षाचे होते.

**श्री. श्याम म्हात्रे**

कामगार नेते आणि आखिल आग्री समाज परिषदेचे अध्यक्ष श्री. श्याम म्हात्रे यांचे दिनांक १० जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६४ वर्षाचे होते.

**श्री. शांताराम दातार**

मराठी भाषा संवर्धन चळवळीचे नेते श्री. शांताराम दातार यांचे दिनांक ११ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७६ वर्षाचे होते.

**श्री. दो. गो. देशपांडे**

ज्येष्ठ साहित्यिक श्री. दो. गो. देशपांडे यांचे वृध्दापकाळाने दिनांक १८ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९३ वर्षाचे होते.

**कवी कुमार आझाद**

तारक मेहता का उलटा चष्मा या लोकप्रिय मालिकेतील डॉ. हंसराज हाथी हि भूमिका निभावणारा अभिनेता कवी कुमार आझाद यांचे ह्रदयविकाराने दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ४५ वर्षाचे होते.

**श्री. सुमंत मस्तकार**

मराठी, हिंदी चित्रपट आणि मालिकामध्ये आपला अभिनयाचा ठसा उमठविणारे ज्येष्ठ अभिनेते श्री. सुमंत मस्तकार यांचे वृध्दापकाळाने दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९६ वर्षाचे होते.

**श्री. जे. पी. वासवानी**

शांतता, मानवता आणि शाकाहार यांच्या प्रसारासाठी आयुष्य वेचणारे अध्यात्मिक गुरु दादा श्री. जे. पी. वासवानी यांचे वृध्दापकाळाने दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९९ वर्षाचे होते.

यानंतर अधिसभेतर्फे वरिल मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन सर्व दिवंगताना दोन मिनिटे उभे राहून मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**अनुपस्थिती**

डॉ. विठ्ठल शिवराव शिवणकर व डॉ. जहांगीर सेथना यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नाही असे कळविल्यामुळे त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

**स्वागत आणि अभिनंदन**

अधिसभेच्या कामकाजाला सुरुवात करताना कुलसचिवांनी प्रा. सुहास र. पेडणेकर यांची कुलगुरु पदावर आणि प्रा. रविंद्र कुलकर्णी यांची प्र—कुलगुरु पदावर नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करुन सर्व सदस्यांतर्फे त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले.

मा. कुलगुरुंनी स्वतःच्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने उपस्थित सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

मा. कुलगुरुंनी डॉ. सुरेश उकरंडे यांची प्रभारी अधिष्ठाता पदावर नियुक्ती केल्याबद्दल, श्री. संजय शहा यांची वित्त व लेखा अधिकारी पदावर शासनाने प्रतिनियुक्ती केल्याबद्दल आणि श्री. दिपेश मेहता, श्री. राजिव काशीकर, श्री. सुधाकर शंकर तांबोळी यांचे कुलपतींचे नामनिर्देशित सदस्य म्हणून नेमणूक झाल्याबद्दल अभिनंदन व स्वागत केले.

<u>प्रा. वैभव नरवडे</u> यांनी मागील सभेच्या इतिवृत्ताबाबत विचारणा केली असताना सदर सभा ही विशेष सर्वसाधारण सभा असून मागील सभेचे इतिवृत्त सभागृहातील मा. अधिसभा सदस्यांच्या समितीमार्फत सुरू असून पुढील अधिसभेच्या बैठकीत इतिवृत्त सादर करण्यात येईल, असे कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी सांगितले,

**बाब क. १** **शैक्षणिक वर्ष २०१९—२० ते २०२३ — २४ करिता पंचवार्षिक बृहत आराखडा व शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता वार्षिक आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३७ (१) (एच अ‍ॅन्ड आय), ७७ व १०७ नुसार अंतिम मंजुरी व शासनाकडे पाठविण्याकरिता अधिसभेच्या विचारार्थ सादर.**

सदर बृहत आराखडा हा प्र—कुलगुरु यांनी मांडला व प्राचार्य (डॉ) मुरलीधर कुन्हाडे यांनी त्यास अनुमोदन दिले.

प्र—कुलगुरू यांनी अधिसभेसमोर पाच वर्षाचा बृहत आराखडा कसा असावा याबद्दल पॉवर पॉईटच्या माध्यमातून सादरीकरण केले व सांगितले की, यासाठी विविध क्षेत्रातील तज्ञांना पाचारण करुन कार्यशाळा घेण्यात आल्या. आराखडा तयार करताना विद्यापीठांतर्गत सात जिल्हयातील शहरी ग्रामीण व अतिदुर्गम भाग इ. सर्वांचा विचार करून विद्यापीठाची सद्याची परिस्थिती व पुढील पांच वर्षातील स्थीतीचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच जागतिक परिस्थितीचा व स्थानिक गरजांचा देखील यात विचार करण्यात आला. यामध्ये विद्यापीठ स्तरावर संशोधनाच्या अनेक सोयी त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व यू.जी.सी. यांचे वेगवेगळे संशोधन प्रकल्प सुरु आहेत त्याचाही विचार करण्यात आला. विद्यापीठाच्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या बहुसंख्य महाविद्यालयांना नॅक मार्फत 'अ दर्जा' मिळालेला आहे, त्यामुळे पुढील कालावधीमध्ये विद्यापीठांतर्गत बहुसंख्य महाविद्यालये नॅकचे मुल्यमापन करून देशातच नव्हे तर

आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा नावलौकिक नक्कीच द्विगुणीत होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

अॅड. अनिल परब यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करून सदर बृहत आराखडयाची प्रत अजूनही प्राप्त न झाल्याने अभ्यास करता आला नाही, असे सांगितले.

यावर मा. कुलगुरुंनी प्रशासनाला या संदर्भात आवश्यक शहानिशा करण्याचे निर्देश दिले व डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा यांना बृहत आराखडयाबाबत सभागृहास माहिती देण्याची विनंती केली.

प्राचार्य (डॉ) मुरलीधर एस. कुऱ्हाडे, प्रभारी अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा यांनी खालिल प्रमाणे बृहत आराखडयाबाबत माहिती दिली :—

माहे सप्टेंबर २०१७ मध्ये दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, रात्र महाविद्यालय, महिला महाविद्यालय, फाईन आर्टस्, अभियांत्रिकी, तंत्र विज्ञान, औषधी विज्ञान, व्यवस्थापन इ.बाबत प्रस्ताव मागविण्यात आले होते. मागील बृहत आराखडयाबाबत त्यांनी जिल्हावार माहिती दिली. यामध्ये मुंबई विद्यापीठांतर्गत ७ जिल्हे आहेत; ज्यामध्ये शहरी व ग्रामीण भाग त्याचबरोबर सिल्वासा, नाशिक व गोवा याठिकाणचे मिळून एकूण ७६५ महाविद्यालयांचा अंर्तभाव आहे. बृहत आराखडा मंजूर करताना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींचा उल्लेख करून त्याद्वारे सदर बृहत आराखडा महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विकास मंडळाला पाठविला जातो. गेल्या वर्षीच्या जाहिरीतीद्वारे एकूण ५७ अर्ज विद्यापीठास प्राप्त झाले होते व यामधील त्रुटी व कमतरता अशा कारणांमुळे २० अर्ज बाद झाले व फक्त ३७ अर्ज व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते, परंतु अल्प प्रतिसादामुळे शासनाच्या आदेशानुसार पुन्हा डिसेंबर महिन्यामध्ये आणखी एक जाहिरात देण्यात आली होती. एकूण सर्व अर्जावर प्रक्रिया करुन शासनाला प्रस्ताव पाठविल्यानंतर शासनाकडून केवळ २२ महाविद्यालयांना मान्यता मिळाली आहे. बृहत आराखडा तयार करताना वार्षिक २०१९—२० व पंचवार्षिक २०१९—२० पासून २०२४ पर्यंत विचार केला आहे. यामुळे सध्याच्या व भविष्यातील गरजा याचा विचार केला आहे. सदर बृहत आराखडा ९ जुलै, २०१८ रोजी व्यवस्थापन परिषद व १० जुलै रोजी विद्वत परिषदेमध्ये संमत करण्यात आला.

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी सांगितले की, सदर बृहत आराखडयाची प्रत उपलब्ध झाली नसल्यामुळे तो कशाप्रकारे मंजूर झाला हे समजत नाही. त्याचप्रमाणे विद्वत परिषदेत याबाबत सदस्यांनी केलेला विरोध नोंदविण्यात आला आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

प्राचार्य (डॉ) मुरलीधर एस. कुऱ्हाडे, प्रभारी अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा यांनी सांगितले की, सदर बृहत आराखडा हा कायद्यातील तरतुदींनुसार सर्व प्रधिकरणांमधून वार्षिक व पंचवार्षिक अशा प्रकारे दोन स्तरावर त्यांच्या तरतुदी व नियमांनुसार पुर्ण विचारांती तयार करण्यात आला आहे. त्याचबरोबर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि मुंबई विद्यापीठात १८ मे, २०१८ रोजी राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली होती.

ॲड. अनिल परब यांनी विचारले की, यापूर्वीच्या बृहत आराखडयानुसार किती प्रमाणात यश मिळाले व सध्याची स्थिती काय आहे ते सभागृहास सांगावे. बृहत आराखड्यातील बिंदुनुसार विद्यापीठ ३५ गुणांनी काठावर उत्तीर्ण झाल्याचे ते म्हणाले. त्याचप्रमाणे मुंबई पूर्व उपनगरामध्ये महाविद्यालयांची आवश्यकता आहे हे देखील सभागृहास स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली.

प्रा. सुरेश मैंद यांनी सांगितले की, बृहत आराखडा अत्यंत घाईगडबडीने केला असून विद्यार्थी, कर्मचारी, शिक्षक, तज्ज्ञ, यांच्याकडून आलेल्या सूचना विचारात घेतल्या नसाव्यात असे वाटते. विद्यापीठातील कलीना या ठिकाणच्या इमारती अत्यंत जीर्ण व जुन्या झाल्या असून अनेक विभागांना नवीन स्वरूप देणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा व तंत्रज्ञान याबाबत या बृहत आराखडयात अंर्तभाव करावा, अशी मागणी त्यांनी केली.

श्रीमती शितल शेठ–देवरुखकर यांनी सदर बृहत आराखडा मराठी भाषेत उपलब्ध करून द्यावा व संकेतस्थळावर देखील उपलब्ध करावा, अशी मागणी केली.

प्रा. गुलाबराव राजे यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये नेमकी किती याचा अर्थबोध होत नाही. त्याचप्रमाणे प्राचार्य (डॉ) कुऱ्हाडे, अधिष्ठाता यांनी मागील बृहत आराखडयामध्ये एकूण ६२ बिंदू ठरविण्यात आल्याचे स्पष्ट केले होते; परंतु त्या बृहत आराखडयात १०१ बिंदु कसे दाखविण्यात आले त्याचा खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षात फक्त ३५ टक्केच बृहत आराखडयामध्ये आपण यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे.

सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्यांना उत्तर देताना कुलगुरुंनी सांगितले की, गेली तीन वर्ष परिपूर्ण अधिसभा नसल्यामुळे ही गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे; यामध्ये प्रामुख्याने सर्व महाविद्यालयांमध्ये एल.आय.सी. पाठविणे आवश्यक असून त्यानुसार विद्यार्थी संख्या, तुकडयांची संख्या, विषयांची गरज, उपलब्ध शिक्षक, नवीन अभ्यासक्रमाचा इ. विचार करून हा बृहत आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

प्राचार्य (डॉ) मुरलीधर एस. कुऱ्हाडे अधिष्ठाता यांनी सांगितले की, विद्यापीठाकडे एकूण ६५ प्रस्ताव आले होते, त्यातील अनेक प्रस्ताव त्रुटींमुळे अमान्य करण्यात आले. महाराष्ट्रामध्ये ९९ टक्क्यांपेक्षा जास्त महाविद्यालये खाजगी व्यवस्थापनांनी सुरु केली आहेत. गेल्या तीन वर्षात महाविद्यालयांकडून खूपच कमी प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण, डोंगराळ भागांसाठी कशा प्रकारच्या सुविधा देता येतील व त्यानुसार मागील बृहत आराखडयामधील बिंदु पुढील आराखडयामध्ये घेतले जातात. मुंबई विद्यापीठात एकूण ४८३ अभ्यासक्रम शिकविले जातात. यामध्ये सर्व विद्याशाखांचा समावेश असून शिक्षण संस्था नवीन अभ्यासक्रम, नवीन वर्ग व नवीन महाविद्यालये इ. अजूनही सुचवू शकतात व त्यामध्ये शहरी व ग्रामीण विभागातील गरजेनुसार शिक्षण देण्याबाबत या बृहत आराखडयामध्ये बदल करण्यात येतील.

श्री. संजय शेटे यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाशी नेमकी किती महाविद्यालये संलग्नित आहेत, याची निश्चित आकडेवारी विद्यापीठाकडे अद्याप उपलब्ध नाही. बृहत आराखडयात ६१ बिंदू दिले असताना फक्त ३७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. याचा अर्थ नवीन प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात संस्थांची उदासीनता दिसून येत आहे. एकूण उच्च शिक्षणामध्ये सरकारचा वाटा फक्त १ ते २ टक्के असून बाकी सर्व खाजगी संस्थामार्फत शिक्षण व्यवस्था चालवली जाते. काळानुरूप अभ्यासक्रमात बदल न केल्यामुळे नवीन पिढीस रोजगार मिळत नाही. यापूर्वी बृहत आराखडयामध्ये प्रस्ताव मोठया प्रमाणात येत असत व याबाबत दोन दिवस सभा चालत असे, परंतु सध्या याचे प्रमाण कमी होते ही चिंतेची बाब आहे व हे विद्यापीठाचे अपयश आहे. वास्तविकतः पदव्युत्तर शिक्षण देणारे विद्यापीठाचे विभाग हे विद्यापीठाचे अंतर्गत विभाग असल्याने त्यांनी त्या त्या विषयांचा प्रसार व विस्तार कसा होईल याबाबतची जबाबदारी पार पाडण्या बरोबरच महाविद्यालयांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. विद्यापीठ फक्त परिक्षा घेऊन विद्यार्थ्यांना पदवी देणे व बृहत आराखडयानुसार आलेले अर्ज शासनास पाठविणे एवढेच काम करीत असल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले की, नवीन महाविद्यालये सुरु करताना LIC चे अहवाल गांभीर्याने घेण्यात यावेत.

विद्यापीठाशी किती महाविद्यालये संलग्नित आहेत हे अजूनही निश्चित नाही याबाबत प्रा. डॉ. वैभव नरवडे यांनी खेद व्यक्त केला. मागील बृहत आराखडयात १०० हून अधिक बिंदू असून फक्त ४७ प्रस्ताव दाखल झाले, त्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. बृहत आराखडा तयार करताना विद्यापीठ व शिक्षण क्षेत्रातील भागधारक विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

मा. कुलगुरू यांनी सांगितले की, बृहत आराखडया संदर्भात दि. २८ जुलै, २०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सन्माननीय सदस्यांनी सुचविलेले सर्व मुद्दे मांडण्यात येतील.

प्र—कुलगुरू यांनी सर्व घटकांकडून बृहत आराखडा तयार करण्यासाठी कशा प्रकारे माहिती मागविली याचा सविस्तर खुलासा केला व याबाबत अधिष्ठाता मंडळ व इतर पदाधिकाऱ्यांच्या ७ ते ८ बैठका घेण्यात आल्या असे ते म्हणाले. सर्व घटकांचे ऑनलाईन अभिप्राय घेण्यात आले. याबाबत सादरीकरण करताना संपूर्ण निकषाची माहिती त्यांनी सभागृहास दिली व संपूर्ण बृहत आराखडा सभागृहापुढे मांडून याबाबत मार्गदर्शन व मान्यतेसाठी सभागृहास विनंती केली.

श्री. मिलिंद साटम यांनी सांगितले की, मा. प्र—कुलगुरू यांनी बृहत आराखडा अतिशय चांगल्याप्रकारे सादर केला; परंतु उपनगरामध्ये लोकसंख्या जास्त असल्यामुळे त्याचा या बृहत आराखडयामध्ये नीट विचार झालेला नसल्याने त्याबाबत देखील विद्यापीठाने कार्यवाही करण्याची विनंती त्यांनी केली.

डॉ. आरती प्रसाद यांनी बृहत आराखडा तयार करताना योग्य प्रकारे सर्व्हे करुन त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक होते. बृहत आराखडयात अनेक त्रुटी दिसून येत आहेत, असे त्यांनी सांगितले.

श्री. प्रदीप सावंत यांनी रत्नागिरीमध्ये वास्तुशास्त्र महाविद्यालय तसेच ठाणे उपकेंद्रात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रयत्न करावेत व रत्नागिरी उपकेंद्र कार्यान्वित करून कोकणातील विद्यार्थ्यांची सोय पाहण्यात यावी व त्यांना मुंबई कलिनापर्यंत पायपीट करावी लागू नये, यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. कल्याण उपकेंद्रात आयडॉलचे केंद्र लवकरात—लवकर सुरू करावे, अशी विनंती त्यांनी केली.

ॲड. अनिल परब यांनी सांगितले की, बृहत आराखड्यामध्ये किती बिंदू दिले आहेत व त्यावर किती सूचना आल्या आहेत. सध्या काही अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात उपलब्ध नसल्याने बाहेरच्या विद्यापीठात विद्यार्थ्यांचा ओघ वाढला आहे. आराखड्याकरिता सूचना मागविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असुन पुढील कालावधीत गरजेनुसार कौशल्य विकासानुरूप अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. नवीन महाविद्यालयांना परवानगी देताना हया गोष्टींचा अंतर्भाव होणे गरजेचे आहे. मुंबई महानगरपालिका, एम.एम.आर.डी.ए, मेट्रो इ. संस्थांना जागा देताना कोणत्या अटी घालण्यात आल्या आहेत व त्याचा विद्यापीठाला किती फायदा होणार आहे ते स्पष्ट करावे. याबाबत होणारे करार पारदर्शी असावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी वसतिगृह असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या सर्वच नियुक्त्या प्रभारी असून त्या लवकरात—लवकर कायमस्वरूपी करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. बृहत आराखड्याची प्रत ई—मेल द्वारे किंवा

पोस्टाने अद्याप मिळाली नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले असता याबाबत गांभीर्याने लक्ष घालण्यात येईल, असे कुलसचिवांनी आश्वासन दिले.

डॉ. अभय वाघ यांनी सांगितले की, बृहत आराखड्याकडे दूरदृष्टीने पाहणे आवश्यक आहे. आपल्या देशाची प्रगती ही जी.डी.पी. च्या माध्यमातून मोजली जाते व त्याअनुषंगाने पुढील पाच वर्षांमध्ये त्यासाठी लागणारे मनुष्य बळ तयार करणे आवश्यक असून यामधून उद्योग, शेती व इतर क्षेत्राचा अभ्यास करून युवकांसाठी कौशल्याच्या आधारे अभ्यासक्रम निर्माण करून पुढची पिढी घडविणे क्रमप्राप्त ठरते. भविष्यामध्ये बृहत आराखडा तयार करताना डिजिटलीकरण, कृत्रिम बुध्दिमत्ता व रोबोटस् इ. गोष्टींचा विचार होणे गरजेचे असल्याने यासाठी नॅसकॉम, सी.आय. अशा संस्थांचे सहकार्य घेणे उचित राहिल. सध्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील सर्वच शाखातील विद्यार्थी आय.टी. क्षेत्रात काम करीत असतील तर हा बृहत आराखडा चुकीचा होऊन धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते.

श्री. धनेश सावंत यांनी यामध्ये पायाभुत सुविधा हा महत्वाचा विषय दुलर्क्षिला असल्याने व आराखड्यामध्ये संख्याशास्त्राचा वापर न झाल्याचे निदर्शनास आणले. कलिना परिसर मध्ये गरवारे संस्था चांगले शैक्षणीक काम करीत आहे; परंतु तेथील इमारतींची अवस्था फार वाईट आहे. त्यामुळे कलिना परिसराचा विकास आराखडा लवकरात–लवकर तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

प्राचार्य नागेंद्रनाथ पांडे यांनी वसई व भिवंडी विभागातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांच्या अडचणी मांडल्या.

ॲड. वैभव थोरात यांनी आयडॉल मार्फत एम.बी.ए., विधी शिक्षण व मोडी भाषा इ. अभ्यासक्रम चालू करावेत, अशी मागणी केली.

डॉ. संगीता पवार यांनी बृहत आरखडयातील काही बाबींवर आपली असहमती व्यक्त केली. बृहत आराखडा तयार झाल्यानंतर तो कार्यान्वित कसा करावा याबद्दलची साशंकता त्यांनी व्यक्त केली. पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयापर्यंत आणणे हे मोठे आव्हान असल्याचे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या अभ्यासक्रमांचा यात अंतर्भाव करण्यात यावा असे सांगितले. सद्यस्थितीत विद्यापीठात अनेक नामांकित महाविद्यालये स्वायतत्तेची मागणी करीत असून पदव्युत्तर अभ्याक्रम मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्थ असल्याने पदव्युत्तर अभ्याक्रमा संदर्भात विद्यापीठाचे नियम स्वायत्त महाविद्यालयांना लागू करणे गरजेचे आहे. एम.एस.सी.च्या राखीव जागा आधिच कमी असल्याने एम.एस.सी. अभ्यासक्रमांची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविताना एस.आय.ई.एस. सारख्या महाविद्यालयात राखीव जागांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी लक्ष द्यावे त्याचप्रमाणे स्कीलबेस्ड कोर्सेस व्हरचुअल क्लास रूमच्या माध्यमातून ग्रामीण महाविद्यालयांपर्यंत पोहचणे महत्वाचे आहे. मुंबई विद्यापीठातील गरीब व निम्न

वर्गातील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रीयेत कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये, याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठातील नवीन नेमणुका करार पध्दतीने जर आपण करणार असू तर आपण स्कीलबेस्ड पध्दत कशा प्रकारे राबवू शकतो असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

प्रा. रविंद्रनाथ रसाळ म्हणाले की, ठाणे जिल्हा पुर्वी अदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जात होता. या जिल्हामध्ये आजही मोठ्या प्रमाणात आदिवासी विद्यार्थी शिकत आहेत, परंतु यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक तेवढे सहकार्य लाभत नाही. भिवंडीमध्ये पॉवर लुमचा व्यवसाय अतिशय मोठया प्रमाणात असल्याने भिवंडीला महाराष्ट्राचे मॅन्चेस्टर देखील म्हटले जाते. भिवंडी हे मुंबईच्या कार्यक्षेत्रामध्ये येत असल्याने व इथे आसपासच्या गावांमध्ये आदिवासी विद्यार्थी मोठया प्रमाणात असल्याने त्यांना जर आपण या व्यवसायाशी जोडून दिले तर उद्योगधंदे व शिक्षण यांची चांगली सांगड घातली जावू शकते व त्यातून आदिवासींचा विकास होऊ शकतो. पुढे ते असेही म्हणाले की, भिवंडीमध्ये काही ठिकाणी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये विनाअनुदानित तत्वावर देण्यास काही हरकत नाही, परंतु भिवंडी मध्येच १२ महाविद्यालये असल्याने तिथे अक्षरक्ष: विद्यार्थ्यांची पळवा–पळवी सुरु असते. त्यामुळे अनुदानित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊन कार्यभार कमी होऊन अनुदानित महाविद्यालये बंद होणार नाहीत, याची काळजी घेण्यात यावी.

प्रा. मृदुल निळे यांनी सांगितले की, या बृहत आराखडयामध्ये बरेचसे अभ्यासक्रम कौशल्य विकासाशी संबंधित आहेत. नॅशनल सेंटर फॉर नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी मध्ये उच्च दर्जाचे संशोधन व्हावे ही बाब चांगली आहे, परंतु त्याचबरोबर तिथे संशोधक देखील असावेत असे अपेक्षित आहे. तिथल्या तीन शिक्षकांना काढून टाकण्याचे चुकीचे आदेश तत्कालीन कुलगुरूंनी दिले होते. ही बाब अन्यायकारक असल्याचे ते म्हणाले. असे असूनही त्या सेंटर मधून १०८ आंतरराष्ट्रीय दर्जाचे पेपर प्रकाशित झाले आहेत याची नोंद घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. केमिस्ट्री विभागातील डॉ. रामन्ना यांनी १४० पेटेंट मिळविलेले आहेत; परंतु या गोष्टी बृहत आराखडयामध्ये दिसत नाहीत. बृहत आराखडा तयार करत असताना समानतेच्या तत्वानुसार साधनसामुग्रीचे वाटप व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्ती केली.

डॉ. निशा मुनी यांनी सांगितले की, बृहत आराखडा तयार करताना एखाद्या भूभागामध्ये किती विद्यार्थी आहेत व ते कशाप्रकारे उच्च शिक्षणात येणार याचा विचार होणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे शिक्षक वर्ग या प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग असून अनुदानित महाविद्यालयांमध्ये आज देखील योग्य संख्येमध्ये शिक्षक मिळत नाही तर विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षक कसे मिळणार व त्याचा परिणाम कसा होईल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. ॲडहॉक शिक्षक नेमताना त्यांना पगार किती दिला जाणार आहे याबाबत स्पष्ट निर्देश विद्यापीठाकडून मिळाल्यास त्यात स्पष्टता येईल. कुठल्याही महाविद्यालयाला परवानगी देताना तेथील सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. बृहत आराखड्या नुसार रात्रकालिन महाविद्यालयांना विद्यार्थी उपलब्ध

होतील काय? याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये रात्र महाविद्यालय स्थापन करण्याचे प्रयोजन इथे दिसत आहे, परंतु मागासलेल्या भागांमध्ये संध्याकाळी ६ नंतर कुठल्याही पध्दतीची दळण-वळणाची साधने नसल्याने विद्यार्थी उपलब्ध होतील काय याबाबत देखील त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

प्रा. सुरेश मैंद यांनी सांगितले की, बृहत आराखडा तयार करताना शास्त्रीयरित्या सॅम्पल सिलेक्शन झाले नसल्याने बृहत आराखडा बनविण्याची प्रक्रिया मुळात बरोबर आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. या बृहत आराखडयासाठी फोकस ग्रुप घेउन बृहत आराखडा बनविण्याची प्रक्रिया करावी. आपल्याकडे उपलब्ध असलेली साधने आपण या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कशी वापरणार हे खूप महत्वाचे आहे. कालिना परिसरातील जागेवर अतिक्रमणे झाली आहेत. तर काही जागेत टेनीस सेंटर सारख्या संस्था उभ्या आहेत, त्यांची तपासणी करणे आवश्यक आहे. अनेक इमारती अत्यंत वाईट अवस्थेत आहेत त्याचे **Structural Audit** त्वरीत करणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध जागेच्या **TDR** संबधीत बाबी योग्य प्रकारे हाताळाव्या.

श्रीमती. शिल्पा पटवर्धन यांनी सांगितले की, गोगटे महाविद्यालयात कौशल्य विकास साधण्यासाठी विद्यार्थ्यांचा एक तास वाढवला असून ३२ तासांचा व ५० तासांचा विशेष अभ्यासक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. ज्यामध्ये सनदी लेखापाल यांच्याद्वारे शनिवार, रविवार प्रत्यक्षात मुलांना प्रशिक्षण देऊन जी.एस.टी. व इतर बाबींबद्दल माहिती देण्यात येते, जेणे करून त्यांना नोकरी मिळणे सुलभ होते. या पध्दतीच्या कौशल्य विकास कार्यक्रमाचा बृहत आराखड्यात समावेश करणे स्वागतार्ह ठरेल.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले की, विद्यापीठाकडे बांधकामासाठी व नुतनीकरणासाठी जो निधी लागणार आहे तो विद्यापीठ कसा उभा करेल हा महत्वाचा विषय आहे. यासंदर्भात विविध महाविद्यालयांकडून संलग्नीकरण शुल्क जे थकबाकीच्या स्वरूपात आहे ते वसुल करण्यासाठी एखादी बाहय संस्थेची नेमणूक करून जर ती वसुल केली तर निधीचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल. निधी उभारण्याच्या कामामध्ये एवढे दुर्लक्ष का होत आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विशेष कार्य दलाने केलेल्या सुचनांची अंमलबाजवणी करण्यासाठी विद्यापीठास शासनाकडून कोटयावधी रुपयांचा निधी उपलब्ध होऊ शकतो असे त्या म्हणाल्या. निधी अभावी बृहत आराखड्यास काहीच अर्थ उरत नाही. विद्यापीठाच्या विकासासाठी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून आपणास काम करावे लागेल. वित्त व लेखाअधिकाऱ्यांनी याबाबतीत विशेष लक्ष घातले पाहिजे व विद्यापीठाचा निधी मिळविण्यासाठी या गोष्टीची दखल गंभीरपणे घेतली पाहीजे, अशी विनंती त्यांनी केली.

ॲड. अनिल परब यांची विधानपरिषदेवर पुन्हा निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा, असा प्रस्ताव श्री. राजन कोळंबेकर यांनी सादर केला असता सभागृहाने त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

बृहत आराखडयाबद्दल फक्त २१३५ लोकांची मते विचारात घेतली आहेत, परंतु या मध्ये ११ वी १२ वीच्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मत विचारात घ्यावें, जेणेकरुन विद्यार्थ्यांचा कल कोणत्या विषयाकडे आहे हे समजेल व त्याप्रमाणे विद्यापीठ विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे शिक्षण देऊ शकेल, असे मत श्री. राजन कोळंबेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. अनंत लोखंडे यांनी सांगितले की, जे अभ्यासक्रम पालघर जिल्हयासाठी सुचविले आहेत तेच अभ्यासक्रम सिंधुदुर्ग जिल्हयासाठी सुध्दा सुचविले आहेत. यामध्ये दोन्ही जिल्हयांचे भौगोलिक वैशिष्टय विचारात घेतली गेलेली नाहीत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये फलोत्पादन व मासेमारी यासंदर्भातील अभ्यासक्रम सुरु करण्याची गरज जास्त आहे. तसेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये व्यवस्थापन विषयक पदव्युत्तर शिक्षणाची सोय असणे आवश्यक असून फलोद्यान, फूड टेक्नोलॉजी, पर्यटन विषयक अभ्यासक्रमावर भर देणे गरजेचे आहे. तसेच या ठिकाणी रात्र महाविद्यालया ऐवजी नियमित महाविद्यालय निर्माण करण्याची गरज असल्याचे आणि या महाविद्यालयांची संख्या वाढविण्यापेक्षा अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या टिकविण्यावर भर देणे जास्त गरजेचे आहे.

श्री. शशिकांत झोरे यांनी सांगितले की, या बृहत आराखड्यात अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयाच्या बाजुला दुसरे महाविद्यालय उभे राहण्याची दाट शक्यता दिसत आहे. या संदर्भात योग्यरितीने चालणारी महाविद्यालये कोणती आहेत याची दखल विद्यापीठाने घेणे गरजेचे आहे. शासनाकडून मान्यता मिळण्याआधी अधिसभेचे मत शासनास कळविणे अगत्याचे आहे. तसेच आपले विद्यार्थी बाहेरच्या विद्यापीठात कोणत्या अभ्यासक्रमासाठी आकर्षित होतात या गोष्टीची दखल घेऊन त्याप्रकारचे अभ्यासक्रम आपल्या विद्यापीठामध्ये सुरू करण्यावर भर देणे गरजेचे आहे. मुंबईची परिस्थिती विचारात घेता उपनगरामध्ये रात्र महाविद्यालयांना परवानगी देणे गरजेचे आहे.

प्राचार्य तुषार देसाई यांनी सांगितले की, अस्तित्वात असलेले अभ्यासक्रम किती प्रभावशाली आहेत याचे परिक्षण करणे जरूरीचे आहे. तसेच अस्तित्वात असेलेल्या अभ्याक्रमात कोणते बदल करावेत याचाही अभ्यास करणे गरजेचे असून बृहत आराखडा तयार करताना याचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. ज्या महाविद्यालयात उपलब्ध साधणे पर्याप्त स्वरुपात असतील तेथे दोन पाळ्यांमध्ये महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी दिली पाहिजे.

प्रा. प्रकाश दातार यांनी सांगितले की, बृहत आराखडा तयार करताना आपण नकाशाचा उपयोग केलेला दिसत नाही. बृहत आराखडयात मुरूड आणि रोहा दरम्यान रात्र महाविद्यालयांची गरज आहे. सध्या मुरुडला असलेल्या महाविद्यालयात कमी विद्यार्थी संख्या भेडसावत असून अलिबाग परिसरात आठ किलोमिटर मध्ये तीन

महाविद्यालये असल्याने या प्रकारच्या रात्र महाविद्यालयाची गरज नसून समुद्र विज्ञान, मत्स्य व्यवसाय व पर्यावरण या विषया संबंधित अभ्यासक्रमाची जास्त गरज आहे.

प्रा. गुलाबराव राजे यांनी बृहत आराखडयात दोष असून सदस्यांनी ज्या दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत त्यांचा समावेश करून ३१ जुलैच्या मर्यादेत सुधारीत आराखडा आपण कसा काय सादर करणार? असा प्रश्न उपस्थित केला. बृहत आराखड्यात अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याची गरज आहे. आज सलंग्न महाविद्यालयांची संख्या प्रचंड वाढल्यामुळे त्यावर योग्यप्रकारे नियंत्रण ठेवणे विद्यापीठास अत्यंत कठिण जात आहे; परंतु बृहत आराखड्यात त्याच्या नियोजनाबाबत कुठेही उपयायोजना सुचविण्यात आल्या नाहीत. आजच्या घडीला सुमारे १८३ अनुदानित महाविद्यालये व ६१५ विनाअनुदानित महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नीत आहेत. अनुदानित महाविद्यालयांना वाचविण्यासाठी विद्यापीठ काय पावले उचलणार हे या बृहत आराखडयामध्ये कुठेही दिसून येत नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. विद्यार्थ्यांची संख्या व शिक्षकांचे गुणोत्तर हे विषम होत चालले असून आज एका वर्गामध्ये १३२ ची पटसंख्या असल्याने गुणवत्तापुर्ण शिक्षणाच्या दृष्टिने ही गोष्ट किती हानिकारक आहे. ठाणे जिल्हा मुंबईच्या अत्यंत जवळ असून त्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. परंतु आजही विद्यापीठामध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह अस्तित्वात नाही, ज्याचा समावेश मागील बृहत आराखडयामध्ये करण्यात आला होता; परंतु या बृहत आराखडयामध्ये काहीच उल्लेख नाही. या आराखड्यातील त्रुटी असून हा बृहत आराखडा मान्य करणे ही घोडचूक ठरेल. शास्त्रीय पध्दतीने सर्वेक्षण करून उपलब्ध माहितीचे वर्गीकरण व त्या आधारित अनुमान या आधारावर बृहत आराखडा तयार करणे हे जास्त योग्य ठरेल. सर्वेक्षणावर आधारित अभ्यासक्रम जर आपण निर्माण केले तर या आराखडयातील विसंगती दूर होतील. रत्नागिरी विभागात जहाज विषयक तंत्रज्ञान अभ्यासक्रम सुरु केले तर ते जास्त सुसंगत ठरेल, शिवाय कोकणामध्ये उपलब्ध होणाऱ्या प्रकल्पांसाठी उपयुक्त ठरतील असे अभ्यासक्रम सुरु करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

वरील चर्चेस अनुसरुन कुलगुरुंनी सभागृहास आश्वासन दिले की, सदस्यांनी बृहत आराखड्यातील लेखी सुचना केल्यास त्यांचा योग्य तो विचार करण्यात येईल.

श्री सुधाकर तांबोळी यांनी गेल्या बृहत आराखडयामध्ये सामाजिक कार्य महाविद्यालयांचा प्रस्ताव होता, त्याप्रमाणे कोकाकोला कंपनी बरोबर एम.ओ.यू. करुन महाविद्यालयात अभ्यासक्रम सुरु करण्यात आले होते त्याबद्दल विद्यापीठाने काही आढावा घेतला आहे काय? विधी महाविद्यालय, स्थापत्यशास्त्र विषयक महाविद्यालयांसाठी परवानगी देताना खरच त्याची गरज आहे का? हे पडताळून पाहणे अत्यंत जरूरीचे आहे व त्याप्रमाणे त्यांचे नियोजन करणेही गरजेचे आहे. याच बरोबर संलग्न महाविद्यालयांची संख्या नेमकी किती आहे, हे सभागृहास सांगावे, अशी त्यांनी विनंती केली.

श्री महादेव जगताप यांनी सांगितले की, बृहत आराखडा व त्यांची मांडण्याची पध्दत अयोग्य असून संक्षिप्तरूपामध्ये वापरलेल्या संज्ञांचा उलगडा होत नाही. वाईल्ड लाईफ व्यवस्थापन यासंदर्भातील कौशल्य विकास अभ्यासक्रम हा पालघर, रत्नागिरी, सिधुदुर्ग जिल्हयामध्ये चालू करावा अशी मागणी त्यांनी केली. महाराष्ट्र अध्यासन अजूनही सुरु झाले नसून त्यासंदर्भात प्राधान्यपूर्वक प्रयत्न करावेत, अशी मागणी त्यांनी केली. डोंबिवली या शहराबाबत उल्लेख बृहत आराखडयात कुठेच नसल्याने या ठिकाणाचे महत्व समजून घेऊन योग्य ती तरतूद बृहत आराखडयात करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली.

सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना कुलगुरु म्हणाले की, ठाणे, रत्नागिरी उपकेंद्रामध्ये प्रभारी संचालकांची नेमणूक करण्यात आलेली आहे व कायद्याप्रमाणे ज्या नेमणूका करणे आवश्यक आहे त्याबाबत प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

प्राचार्य (डॉ) मुरलीधर कुऱ्हाडे यांनी सांगितले की, सदस्यांनी बृहत आराखड्यातील उपस्थित केलेल्या विविध मुद्यांवर बोलताना ज्या वेगवेगळया सुचना केल्या आहेत तसेच समुद्र विज्ञान व भुगोल या विषयासंदर्भात, डोंगराळ प्रदेशात वन्यजीव आणि पर्यावरणासंदर्भात उपक्रम विद्यापीठांतर्गत करणे बाबत तसेच इतरही सुचना केल्या त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

बृहत आराखड्यातील चर्चेत ॲड. अनिल परब, प्रा. सुरेश मैंद, श्रीमती शितल शेठ–देवरुखकर, प्रा. गुलावरावराजे, श्री. सुधाकर तांबोळी, डॉ. सुप्रिया करंडे, श्री. संजय शेटे, प्राचार्य रोकडे, प्रा. वैभव नरवडे, श्री. मिलिंद साटम, डॉ. आरती प्रसाद, श्री. प्रदिप सावंत, डॉ. अभय वाघ, श्री. धनेश सावंत, प्राचार्य. नागेंद्रनाथ पांडे, ॲड. वैभव थोरात, डॉ. संगिता पवार, प्रा. रविंद्रनाथ रसाळ, प्रा. मृदुल निळे, डॉ. निशा मुनी, शशिकांत झोरे, प्राचार्य तुषार देसाई, प्रा. प्रकाश दातार, डॉ. लाखंडे व इतर काही सदस्यांनी भाग घेउन विविध सुचना केल्या. वरील सुचनांसह बृहत आराखड्याबाबत सदस्यांनी त्यांच्या लेखी सूचना पाठविल्यास त्याचा नक्कीच विचार करण्यात येईल, असे कुलगुरुंनी सांगितले. बृहत आराखड्याबाबत सखोल चर्चा व त्यावर कुलगुरुंनी केलेल्या निवेदनानंतर असा ठराव करण्यात आला की, सर्व सुचनांचा विचार करुन शैक्षणिक वर्ष २०१९–२० ते २०२३–२४ करिता पंचवार्षिक बृहत आराखडा व शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता वार्षिक योजनेमध्ये अंर्तभाव करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले व सदर पंचवार्षिक बृहत आराखडा आणि वार्षिक योजना शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली.

अध्यक्षांच्या परवानगीने कुलसचिवांनी भोजनासाठी सभा स्थगीत केल्याचे घोषीत केले. भोजनानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

औचित्याचा मुद्दा उपस्थित करताना ३ प्रश्न सभागृहापुढे आले ज्यात बृहत आराखडा पुर्न:विचारासाठी पाठवावा. स्थगन प्रस्तावाबद्दलची भूमिका व मतदानांच्या अधिकाराबद्दल जे आक्षेप नोंदविले गेले त्याचे काय? या प्रश्नांना उत्तर देताना कुलगुरूंनी सभागृहास संबोधित करून सांगितले की बृहत आराखडयासंदर्भात सभागृहाने त्यांना अधिकार दिले आहेत, त्यानुसार सदस्यांनी केलेल्या सूचनांचा बृहत आराखडयात समावेश करण्यात येईल. यासंदर्भात दिनांक २८ आणि २९ जुलै २०१८ रोजी प्र—कुलगुरू आणि अधिष्ठातांची आणखी एक बैठक महाराष्ट्र शासनाने बोलाविली आहे. त्यानंतर बृहत आराखडा शासनास सुपुर्द केला जाईल.

प्रा. गुलाबराव राजे आणि प्रा. वैभव नरवडे यांचेकडून प्राप्त स्थगन प्रस्तावातील मुद्यांबाबत अध्यक्षांनी या प्रस्तावांवर संबधीत सदस्यां सोबत वेगळी बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहास दिले. कुलगुरुंच्या आश्वासनांनुसार सदस्यांनी त्यांचे प्रस्ताव मागे घेतले.

........................................................................................................

बाब क. २ **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८ (२) नुसार विविध पोटकलमांतर्गत अधिसभेवर निवडून आलेल्या विविध मतदारसंघाच्या प्रतिनिधीमधून खालील प्राधिकरणांवर अधिसभा सदस्य नामनिर्देशित/निवडून द्यावयाचे आहेत.**

**२ (अ) व्यवस्थापन परिषद**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४) (च) (f) नुसार दोन प्राचार्य, (छ) (g) नुसार दोन अध्यापक, (ज) (h) नुसार दोन व्यवस्थापन प्रतिनिधी व (झ) (i) नुसार दोन नोंदनीकृत पदविधर व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यासाठी निवडणुका घेणे.**

प्राचार्य — ३०(४) (च) (f)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४) (च) (f) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून अधिसभेच्या दोन प्राचार्यांना व्यवस्थापन परिषदेवर निवडून दयावयाच्या दोन प्राचार्यांच्या जागांसाठी खालील उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | भामरे अजय मुरलीधर | खुला |
| २ | गोंडा महादप्पा गंगाराम | विमुक्त जाती व भटक्यां जमाती |

व्यवस्थापन परिषदेवर खालिल प्राचार्यांची **बिनविरोध** निवड झाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | भामरे अजय मुरलीधर | खुला |
| २. | गोंडा महादप्पा गंगाराम | विमुक्त जाती व भटक्या जमाती |

**अध्यापक व विद्यापीठ अध्यापक — ३० (४) (छ) (g)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४) (छ) (g) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक व विद्यापीठ अध्यापकांमधून जे मान्यताप्राप्त संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक नाहीत असे दोन अध्यापक अधिसभेने व्यवस्थान परिषदेवर निवडून दयावयाच्या दोन अध्यापकांच्या जागांसाठी खालिल उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जागा | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | नरवडे वैभव एकनाथ<br>कुलकर्णी चंद्रशेखर बाळकृष्ण | १ | खुला |
| २ | सांगुर्डे रविकांत बाळकृष्ण | १ | अनुसुचित जमाती |

खुला प्रवर्गात दोन उमेदवार असल्यामुळे छाननी समिती गठीत करण्यात आली. समितीसाठी प्राचार्य कुऱ्हाडे, प्राचार्य उकरंडे व डॉ. रश्मी ओझा यांना नेमण्यात आले. खुल्या प्रवर्गासाठी मतदान झाले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मधील कलम ३०(४)(छ)(g) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक व विद्यापीठ अध्यापक यांच्यामधून व्यवस्थापन परिषदेवर खालील सदस्य बहुमताने निवडून आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | नरवडे वैभव एकनाथ | खुला, |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४)(छ)(g) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक व विद्यापीठ अध्यापकांमधून व्यवस्थापन परिषदेवर खालील सदस्य बिनविरोध निवडून आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | सांगुर्डे रविकांत बाळकृष्ण | अनुसुचित जमाती |

................................................................................

**व्यवस्थापन प्रतिनिधी — ३०(४) (ज) (h)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४) (ज) (h) नुसार अधिसभेच्या बैठकीतील निवडणूकीद्वारे व्यवस्थापन परिषदेवर निवडून दयावयाच्या दोन व्यवस्थापन प्रतिनिधींच्या जागांसाठी खालिल उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | हेळेकर नील गिरीश | खुला |
| २ | वाघमारे सुभाष कृष्णा | अनुसुचित जाती |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४)(ज)(h) नुसार अधिसभा सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेचे प्रतिनिधी म्हणून खालिल सदस्य बिनविरोध निवडून आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | हेळेकर नील गिरीश | खुला |
| २. | वाघमारे सुभाष कृष्णा | अनुसुचित जाती |

.....................................................................................................

नोंदणीकृत पदवीधर — ३० (४) (झ) (i)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४) (झ) (i) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या नोंदणीकृत पदवीधरांमधून अधिसभेने दोन नोंदणीकृत पदवीधर व्यवस्थापन परिषदेवर निवडून दयावयाच्या दोन नोंदणीकृत पदवीधरांच्या जागांसाठी खालिल उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | सावंत प्रदीप बाळकृष्ण | खुला |
| २ | कोळंबेकर राजन वसंत | इतर मागासवर्ग |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३० (४) (झ) (i) नुसार अधिसभा सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर खालिल सदस्य बिनविरोध नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी म्हणुन निवडून आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | सावंत प्रदीप बाळकृष्ण | खुला |
| २. | कोळंबेकर राजन वसंत | इतर मागासवर्ग |

.....................................................................................................

२ (ब) विद्या परिषद

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २०१६ च्या कलम ३२(३)(ज)(h) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीमधून अधिसभेने एका सभासदाचे विद्यापरीषदेवर नामनिर्देशन करावे.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ३२(३)(ज)(h) नुसार अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीमधून खालील सदस्याचे विद्यापरिषदेवर नामनिर्देशन केले आहे.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ३२(३)(ज)(h) | शेटे संजय बाबूराव |

सूचक — प्रा. तुषार देसाई
अनुमोदक — ॲड. निल गिरीश हेळेकर

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ३२(३)(ज)(h) नुसार व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींमधून एका जागेसाठी एकच नामनिर्देशन झाल्याने खालिल सदस्याचे एकमताने नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ३२(३)(ज)(h) | शेटे संजय बाबूराव |

---

**२ (क) <u>स्थायी समिती</u>**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७० (३) नुसार अधिसभेने आपल्या सदस्यांमधून (ङ) (e) नुसार एक प्राचार्य, (च) (f) नुसार एक अध्यापक आणि (छ)(g) नुसार एक पदविधर यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करावे.**

**प्राचार्य —**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(ङ)(e) मधील तरतुदी नुसार अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य सदस्यांमधून खालील सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन केले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७०(३)(ङ)(e) | प्राचार्य रोकडे विठ्ठल बळीराम |

सूचक — प्रा. तुषार देसाई
अनुमोदक — प्राचार्य मुरलीधर कुऱ्हाडे

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(ङ)(e) नुसार प्राचार्य प्रतिनीधी मधून एका जागेसाठी एकच नामनिर्देशन झाल्याने खालिल सदस्यांचे एकमताने नामनिर्देशन कारण्यात आले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७०(३)(ङ)(e) | प्राचार्य रोकडे विठ्ठल बळीराम |

---

**अध्यापक —**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(च)(f) मधील तरतुदी नुसार अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक सदस्यांमधून खालील सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन केले.

| अ.क्र. | कलम | उमेदवाराचे नाव | जागा |
|---|---|---|---|
| १. | ७०(३)(च)(f) | प्रा. मैंद सुरेश नामदेव | १ |

सूचक — प्रा. वैभव नरवडे
अनुमोदक — ॲड. निल गिरीश हेळेकर

| अ.क्र. | कलम | उमेदवाराचे नाव | जागा |
|---|---|---|---|
| १. | ७०(३)(च)(f) | प्रा. पी. डी. दातार | १ |

सूचक — प्रा. गुलाबराव राजे
अनुमोदक — डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी

अध्यापक प्रवर्गाच्या एका जागेसाठी दोन सदस्यांचे नामनिर्देशन झाल्यामुळे मतदान घेण्यात आले व खालील सदस्य बहुमताने निवडून आले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७०(३)(च)(f) | प्रा. मैंद सुरेश नामदेव |

---

**पदवीधर —**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(छ)(g) मधील तरतुदी नुसार अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या पदविधर सदस्यांमधून खालील सदस्याचे स्थायी समितीवर नामनिर्देशन केले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७०(३)(छ)(g) | श्री पाटकर प्रविण महादेव |

सूचक — ॲड. अनिल परब
अनुमोदक — श्री प्रदिप सावंत

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(छ)(g) नुसार पादविधर सदस्यां मधून एका जागेसाठी एकच नामनिर्देशन आल्याने खालिल सदस्यांचे एकमताने नामनिर्देशन कारण्यात आले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७०(३)(छ)(g) | श्री पाटकर प्रविण महादेव |

---

## २ (ड) तक्रार निवारण समिती

Item for nomination of two Senate Members by Senate on Grievance Committee (One teacher Belonging to Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (Vimukta Jatis) or Nomedic Tribes or Other Backward Classes and one non-teaching employee as per Section 79 (3)(e) of the Maharashtra Public Unversities Act, 2016 for consideration of the Senate.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मधील कलम ७९(३)(ङ)(e) नुसार अधिसभेने दिनांक २१जुलै, २०१८ च्या सभेत अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक सदस्यांमधून खालील सदस्यांचे तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन केले आहे.**

**अध्यापक —**

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ७९(३)(ङ)(e) | डॉ. संगीता पवार | अनुसूचित जाती |

सूचक — प्रा. मैंद सुरेश नामदेव
अनुमोदक — प्राचार्य रोकडे विठ्ठल बळीराम

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ७९(३)(ङ)(e) | प्रा. गुलाबराव राजे | अनुसूचित जाती |

सूचक — डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी
अनुमोदक — डॉ. रविकांत सांगुर्डे

अध्यापक प्रवर्गाच्या एका जागेसाठी दोन सदस्यांचे नामनिर्देशन झाल्यामुळे मतदान घेण्यात आले व खालील सदस्य बहुमताने निवडून आले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ७९(३)(ङ)(e) | डॉ. संगीता पवार | अनुसूचित जाती |

.................................................................................................

**अध्यापकेतर कर्मचारी**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मधील कलम ७९(३)(ङ)(e) नुसार अधिसभेने दिनांक २१जुलै, २०१८ च्या सभेत अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापकेतर कर्मचारी सदस्यांमधून खालील सदस्यांचे तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन केले आहे.**

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७९(३)(ङ) (e) | श्री. दिलीप दगडु पवार |

सूचक — प्राचार्य. नागेंद्रनाथ बेचन पांडे
अनुमोदक — प्राचार्य विठ्ठल रोकडे

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(ङ)(e) नुसार अध्यापकेत्तर कर्मचारी मधून एका जागेसाठी एकच नामनिर्देशन झाल्याने खालिल सदस्यांचे एकमताने नामनिर्देशन करण्यात आले.

| अ.क्र. | कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | ७९(३)(ङ) (e) | श्री. दिलीप दगडु पवार |

कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडून आलेल्या व नामनिर्देशित झालेल्या सर्व उमेदवारांचे नाव घोषीत केले. कुलगुरुंनी निवडणूका व नामनिर्देशनाद्वारे विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडून आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन केले, तसेच खेळीमेळीच्या वातावरणात बैठक संपन्न झाली, त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

## दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या अधिसभेच्या विशेष सभेचे इतिवृत्तावरिल शुध्दिपत्र

| पृष्ठ क्र. | परिच्छेद क्र. | ओळ क्र. | च्या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|---|---|
| २ | (अनु क्र. ४०) | २६ | प्रदिप | प्रदीप |
| ३ | – | ९ | दिर्घ | दीर्घ |
| ३ | – | १० | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ३ | – | १२ | दिर्घ | दीर्घ |
| ३ | – | १३ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ३ | – | १६ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ३ | – | १७ | गाडगिळ | गाडगीळ |
| ३ | – | १८ | गाडगिळ | गाडगीळ |
| ३ | – | १९ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ३ | – | २१ | भावगित | भावगीत |
| ३ | – | २१ | दिर्घ | दीर्घ |
| ३ | – | २२ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ३ | – | २४ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | ३ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | ७ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | ९ | व्यक्तीमत्वाने | व्यक्तिमत्वाने |
| ४ | – | १० | प्रकाश झोतात | प्रकाशझोतात |
| ४ | – | ११ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | १५ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | १८ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | २० | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ४ | – | २४ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | २ | आखिल | अखिल |
| ५ | – | ३ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | ६ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | ९ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | १३ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | १६ | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ५ | – | २० | मृत्युसमयी | मृत्यू समयी |
| ६ | ३ | ९ | राजिव | राजीव |
| ६ | ७ | २६ | स्थीतीचा | स्थितीचा |
| ६ | ७ | ३२ | मुल्यमापन | मूल्यमापन |
| ७ | ४ | १० | खालिल | खालील |
| ७ | ५ | १९ | जाहिरीतीद्वारे | जहिरातीद्वारे |
| १० | १ | १ | आराखडया संदर्भात | आराखडयासंदर्भात |
| ११ | ६ | २८ | अधिनस्य | अखत्यारीत |
| १२ | ४ | ३६ | आराखड्या नुसार | आराखड्यानुसार |
| १३ | २ | १३ | संबधीत | संबधित |
| १३ | ३ | १८ | जेणे करुन | जेणेकरुन. |
| १३ | ४ | ३२ | पाहीजे | पाहिजे |
| १४ | ३ | १८ | बाजुला | बाजूला |
| १४ | ३ | १९ | योग्यरितीने | योग्यरीतीने |
| १४ | ४ | २७ | परिक्षण | परीक्षण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ५ | ३५ | किलोमिटर | किलोमीटर |
| १५ | १ | २ | विषया संबंधित | विषयासंबंधित |
| १५ | ३ | २७ | सुचना | सूचना |
| १५ | ४ | ३३ | याच बरोबर | याचबरोबर |
| १६ | ३ | १४ | सुचना | सूचना |
| १६ | ३ | १५ | भुगोल | भूगोल |
| १६ | ३ | १७ | सुचना | सूचना |
| १६ | ४ | २४ | सुचनांसह | सूचनांसह |
| १६ | ५ | ३३ | स्थगीत | स्थगित |
| १६ | ५ | ३३ | घोषीत | घोषित |
| १७ | १ | १ | ३ | तीन |
| १७ | १ | २ | पुर्न:विचारासाठी | पुनर्विचारासाठी |
| १७ | २ | १० | संबधीत | संबधित |
| १७ | २ | १० | सदस्यां सोबत | सदस्यांसोबत |
| १७ | ६ | २९ | खालिल | खालील |
| २० | १ | ७ | खालिल | खालील |
| २० | ४ | २४ | प्रतिनीधी मधून | प्रतिनिधीमधून |
| २१ | १ | ३ | तरतुदी नुसार | तरतुदीनुसार |
| २३ | २ | ११ | निवडणूका | निवडणुका |

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ